**<u>नि.दि.दावा क्र. ३१६/२०२४</u>**
(CNR : MHNS200009472024)
युवराज वि. बाळकृष्ण व इतर

## निशाणी क्र. ०५, २८ व ३७ वरील संयुक्त आदेश

वादीने निशाणी क्र. ०५ वरील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९, नियम १ प्रमाणे प्रतिवादी क्र. ०१, ०९, १० व ११ विरूध्द् तुर्तातूर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. निशाणी क्र. ०५ वरील अर्ज प्रलंबित असताना वादीने निशाणी क्र. २८ वरील अर्ज निशाणी क्र. ०५ वरील अर्ज निकाली निघेपर्यंत प्रतिवादी क्र. ०१, ०९ व १० विरूध्द् तुर्तातूर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तसेच वादीने निशाणी क्र. ३७ वरील अर्ज निशाणी क्र. ०५ वरील अर्ज निकाली निघेपर्यंत प्रतिवादी क्र. ०९ व १० विरूध्द् तुर्तातूर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तिन्ही अर्जांवर उभय पक्षकारांतर्फे एकत्रित युक्तिवाद केल्याने सदरचे अर्ज निकालासाठी एकत्रित घेण्यात येत आहेत.

**२.** वादीचे कथन असे आहे की, मिळकतीचे वर्णन :—

**अ.** मौजे सिन्नर—२, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील सिन्नर नगरपालिका हद्दीतील बिनशेती मिळकती यांसी :—

i) भुमापन क्र. १०७६/५/अ/१/अ/अ (जुना सर्व्हे नं. १२८०/५अ) यातील प्लॉट नं. १, क्षेत्र ८.६०.५० आर. चौ.मी., आकार रू. ६२०.०० पैसे, चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे/मंजुर लेआउट प्रमाणे,

ii) भुमापन क्र. १०७६/५/अ/१/अ/अ (जुना सर्व्हे नं. १२८०/५अ) यातील प्लॉट नं. २, क्षेत्र ३.१४ आर. चौ.मी., आकार रू. २२६.०० पैसे, चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे/मंजुर लेआउट प्रमाणे,

**ब.** कसबे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील सिन्नर नगरपालिका हद्दीतील मिळकती यांसी :—

i) सिटी सर्व्हे नं. ३२५१, क्षेत्र ७५.५० चौ.मी., आकार व चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे,

ii) सिटी सर्व्हे नं. ३२५२, क्षेत्र १५.९० चौ.मी., आकार व चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे; येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती. तसेच सदर मिळकतींमधील रस्ते व तद्ंगभुत सुखसुविधांसह दरोबास्त मिळकती, हा या दाव्याचा विषय असून त्यास यापुढे ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येत आहे.

**३.** वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या सामाईकातील मिळकती असुन सदर मिळकतींचे संदर्भाने अद्यापपावेतो वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांचे दरम्यान सरसनिरस मानाने वाटपतुटक झालेले नसुन सदरहू मिळकती ह्या अद्यापपावेतो एकत्रातील आहेत. तसेच दावा मिळकतींपैकी दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेला भुमापन क्र. १२८०/५अ तसेच १२८०/५ब या मिळकती पुर्वी वादीचे आजोबा नामे राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांनी एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातुन सन १९५० साली खरेदी घेतलेल्या होत्या. त्यानंतर सन १९८८ साली भुमापन क्र. १२८०/५अ व भुमापन क्र. १२८०/५ब या मिळकतींच्या संदर्भाने पोटहिस्से पडले व त्यानुसार १२८०/५अ म्हणजेच १०७६/अ(५अ)/१ पैकी ००हे. ११आर. इतके क्षेत्र राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांना प्राप्त झाले. त्याबाबत फेरफार नोंद नं. १२८८८ पारीत झालेली आहे. अशा प्रकारे दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या रे.ऑ.रा.ला राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांच्या नावाची नोंद झालेली होती. तसेच दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांनी सन १९६४ साली एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन खरेदी घेतलेल्या होत्या व आहेत. अशा प्रकारे दावा मिळकतींचे रे.ऑ.रा.ला पुर्वी वादींचे आजोबा नामे राजराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांचे नावाची नोंद होती. त्यानुसार राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांचे नावाची नोंद होती. त्यानुसार राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे तसेच वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांचा वंशवृक्ष देण्यात आलेला आहे.

**४.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी हे मयत राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांची मुलगी नामे शांताबाई हिचा मुलगा असुन मयत राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांचा नातु आहे. तसेच प्रतिवादी क्र. ०१ हे

वादीचे मामा, प्रतिवादी क्र. ०२ ते ०५ या वादीच्या आईच्या बहिणी म्हणजेच वादीच्या मावशा, प्रतिवादी क्र. ०६ ही वादीची बहिण, प्रतिवादी क्र. ०७ हा वादीचा भाऊ व प्रतिवादी क्र. ०८ हे वादीचे वडील असुन ते दि. २४/१०/२०२१ रोजी पासुन परागंदा आहेत. त्याबाबत वादी हे अलहिदा कार्यवाही करणार आहेत. येणे प्रमाणे, वादी व प्रतिवादी क्र. ०८ यांचा वंशवृक्ष व नातेसंबंध असुन वादी व प्रतिवादी क्र. ०६ ते ०८ यांचा दावा मिळकतीमध्ये कायद्याने व वारसाने १/६ इतका अविभक्त हिस्सा होता व आहे.

**५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, अशी परिस्थिती असतांना प्रतिवादी क्र. ०१ याने मयत राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांना दारुचे व्यसन असल्याचा व त्यांचे अशिक्षित व अडाणीपणाचा गैरफायदा घेत वादीची मयत आई शांताबाई हीची कोणतीही संमती न घेता तसेच तिला कोणतीही माहिती न देता सन १९९५ साली सर्व्हे नं. १०७६/५/अ/१/अ पैकी ० हे. ११ आर. या मिळकतीचे रे.ऑ.रा.ला कोणत्याही कायदेशीर दस्ताशिवाय फक्त फेरफार नोंद क्र. १६७९५ अन्वये त्यांच्या नावाची नोंद बेकायदेशीररित्या करुन घेतली. तसेच त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने सन २००५ साली भुमी अभिलेख कार्यालय, सिन्नर येथे दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या रे.ऑ. रा.ला मयत राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यांची वारस नोंद होणेकामी अर्ज सादर केला. सदर अर्ज सादर करतेवेळी प्रतिवादी क्र. ०१ ने जाणीवपुर्वक वादीची मयत आई नामे शांताबाई तसेच वादी यांना वारसपणात सामिल न करता तसेच वादींचा सदर मिळकतीतील हक्क व हिस्सा गिळंकृत करण्याच्या गैरहेतुने खोटे अर्ज व प्रतिज्ञापत्र भुमिअभिलेख कार्यालय, सिन्नर येथे सादर करुन दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या रे.ऑ.रा.ला त्यांची तसेच मयत बबाबाई व प्रतिवादी क्र. ०२ ते ०५ यांच्या नावाची वारस नोंद करुन घेतली.

**६.** वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने मौजे सिन्नर येथील भुमापन क्र. १०७६/५/अ/१ या मिळकतीचे वादींना कोणतीही माहिती न देता व वादींची संमती न घेता सन २०१९ साली बिनशेती मध्ये रुपांतरण करुन घेतले व त्यानंतर दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत अस्तित्वात आली. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ ने वादींची कोणतीही

संमती न घेता व वादींना कोणतीही माहिती न देता वादींचा दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीतील हक्क व हिस्सा गिळंकृत करण्याच्या दृष्ट हेतुने दावा कलम १ अ (i) मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने दि. २४/१२/२०२० रोजी प्रतिवादी नं. ९ व १० यांना विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० हा दस्त लिहुन व नोंदवुन दिला. तसेच त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने वादींची कुठलीही संमती न घेता दावा कलम १ अ (ii) यात नमुद केलेली मिळकत दि. ०९/११/२०२१ रोजी बेकायदेशीररित्या दस्त क्र. ४०६९/२०२१ अन्वये प्रतिवादी क्र. ११ यांना हस्तांतरीत केली. सदर दोन्हीही दस्तांमध्ये वादी हे पक्षकार नव्हते, तसेच वादींनी सदर दस्तात कोणत्याही प्रकारे संमती दिलेली नव्हती अथवा वादींना सदर दस्तांसंबंधी कोणतीही माहिती नव्हती. अशा प्रकारे प्रतिवादी क्र. ०१ हे वादींचा दावा मिळकतीतील वारसाने व कायद्याने असलेला हक्क व हिस्सा गिळंकृत करण्याच्या गैरहेतुने दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करीत असल्याची बाब वादींना जुन २०२४ मध्येच समजली. तेव्हा वादींनी प्रतिवादी क्र. ०१ व इतर प्रतिवादी यांना त्यांचे वकील ॲड. श्री. आत्माराम पुंजाजी उगले यांचे मार्फत दि. ०५/०६/२०२४ रोजी नोटीस पाठवून दावा मिळकतीतील वादींच्या वारसाने व कायदयाने असलेला हिस्सा वाटपतुटक करुन देणेबाबत मगणी केली. सदर नोटीस प्रतिवादी क्र. ०१ यांना मिळूनही प्रतिवादी क्र. ०१ यांनी वादींचा दावा मिळकतीतील वारसाने व कायद्याने असलेला हिस्सा वाटपतुटक करुन न देता त्यांचे वकील नामे श्री. प्रभाकर रघुनाथ कोकाटे यांच्या मार्फत दि. २१/०६/२०२४ रोजीचे खोटे नोटीस उत्तर वादींना पाठविले व वादींना त्यांचे दावा मिळकतीतील वारसाने व कायद्याने असलेला हिस्सा वाटपतुटक करुन देण्यास स्पष्टपणे नकार दिला.

**७.** वादीचे पुढे असे कथन आहे की, अशा प्रकारे प्रतिवादी क्र. ०१ यांनी वादींचा दावा मिळकतीतील असलेला हक्क व हिस्सा गिळंकृत करुन व गिळंकृत करण्याच्या गैरहेतूने दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण केल्यास तसेच दावा मिळकतीचे स्वरुपात बदल केल्यास अथवा दावा मिळकतीत बांधकाम केल्यास वादींचा दावा मिळकतीत वारसाने व कायद्याने असलेला हक्क व हिस्सा नष्ट होऊन वादींचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे फार मोठे

नुकसान होणार आहे. त्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला असून प्रतिवादी क्र. ०१, ०९ व १० यांनी वर दावा कलम १ अ (i) यात नमुद केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने सदर मिळकतींची स्वत: अगर इतर कोणाही मार्फत गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये. तसेच सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये, अथवा सदर मिळकतीतील बांधीव क्षेत्र कोणासही हस्तांतरण करु नये अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये. तसेच प्रतिवादी क्र. ११ यांनी दावा कलम १ अ (ii) यात नमुद केलेल्या मिळकतीचे स्वत: अथवा इतर अन्य, कुटुंबिय, नोकर, एजंट, नातेवाईक अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये, तसेच सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये, अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, तसेच प्रतिवादी क्र. ०१ याने दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळतीच्या रे.ऑ.रा.ला त्याचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीची स्वत: अथवा इतर अन्य, कुटूंबिय, नोकर, एजंट, नातेवाईक अथवा कोणाही मार्फत कोणासही गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये. तसेच सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र. ०१, ०९, १० व ११ यांना देणेसाठी वादींचा प्रतिवादींविरूध्द प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ०६ ते ०८ यांच्या विरूध्द वादीची कोणतीही मागणी नसुन दाव्यास तांत्रिक दोष राहु नये म्हणुन त्यांना प्रतिवादीपणात सामिल केलेले आहे. तरी, अर्ज मंजूर होण्यास विनंती केली आहे. अर्जाच्या पृष्टयर्थ निशाणी क्र. ०६ अन्वये प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे.

८. प्रतिवादी क्र. ११ यांना समन्स व नोटीसची बजावणी होवूनही ते दाव्यात हजर न झाल्याने त्यांचेविरूध्द् दाव्याचे कामकाज एकतर्फा चालविण्यात आल्याचा आदेश पारित करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ०१ यांना दाव्याचे समन्स व नोटीस पोस्टाने पाठविल्याच्या पावतीची छायांकित प्रत वादीतर्फे दाखल

करण्यात आली आहे. परंतु, त्याचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावरील दिलासा मिळण्याची निकड लक्षात घेवून निशाणी क्र. ०५ व २८ वरील सदर प्रतिवादी क्र. १ विरूध्द्चे अर्ज अंतिम सुनावणीसाठी घेण्यात आले आहेत.

**९.** प्रतिवादी क्र. ०९ व १० ने दाव्यात हजर होवून निशाणी क्र. ३५ अन्वये प्रस्तुत अर्जास असे म्हणणे सादर केले की, प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशीर असुन तो त्यांस मान्य व कबुल नाही. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, दाव्यास कायदेशीर कारण घडलेले नाही. दावा मुदतीत दाखल केला नाही. वादीने दाव्याची आकारणी कायदेशीर केलेली नाही व तसा मुद्रांक दिलेला नाही. खरेदीखत दस्त क्र. ४०६९/२०२१ हा किंमत रू. १७ लाखांचा असुन विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० हा रू. ८४,३५,०००/— चा आहे. सदर खरेदीखताचे व विकसन करारनाम्याचे किंमतीनुसार वादीने दाव्याची किंमत ठरवून सदर रक्कमेवर कोर्ट फि स्टॅम्प लावणे आवश्यक असतांना तसे झालेले नाही. मयत राजाराम उर्फ राजहंस यशवंत सरोदे यास वडीलोपार्जित कोणत्याही मिळकती नव्हत्या व त्यास कोणतेही आर्थिक उत्पन्न मिळत नव्हते. मयत राजाराम तसेच त्यांचे भाउ पांडूरंग व रामदास यांनी त्यांचे विडी मजुरीचे व शेत मजुरीचे पैशातुन दिनांक १३/०४/१९५० रोजी यसुदाबाई राधूसिंग परदेशी यांचेपासुन रक्कम रू. १,५००/— ला सर्व्हे नं. १२८०/५(१०७६)५ ही मिळकत खरेदी घ ेतली असुन सदर मिळकत ही राजाराम यांची स्वकष्टार्जित व स्वसंपादीत खरेदी मालकीची असुन ती त्यांचे हयातीत तबदील करण्याचा त्यांना हक्क होता. त्या अधिकारात त्यांनी त्यांचे हयातीत सन १९९५ मध्ये प्रतिवादी क्र. ०१ चे नावावर हस्तांतर करून कब्जात दिलेले आहे. त्याबाबत ६ड नोंद क्र. १६७९५ दिनांक २०/१२/१९९५ रोजी मंजुर झाली असुन तेव्हांपासून ते आजतागायत सदर नोंदीस हरकत घेण्यात आलेली नाही. त्यामुळे २९ वर्षांनंतर वादीस सदर नोंदीबाबत हरकत घेण्याचा कायदेशीर हक्क नाही. राजाराम हे निर्व्यसनी, शिक्षीत व सुदृढ होते. त्यामुळे त्याबाबत वादीने घेतलेला आक्षेप चुकीचा आहे.

**१०.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचे पुढे असे म्हणणे आहे की, शांताबाई साठे या दिनांक ०२/०८/२००० रोजी मयत झालेल्या असुन त्यांचे मृत्युनंतर

सुरू झालेल्या वारसाहक्काबाबत वारसांनी कोणतीही कारवाई केली नाही. २४ वर्षांच्या विलंबाने केलेला दावा हिंदु वारसा हक्क कलम ६ व लिमिटेशन ॲक्ट कलम ३ नुसार मुदतबाहय असल्याने तो रद्द होण्यास पात्र आहे. (२०१५(२)एम.एल.जे.८१२). दावा मिळकती या राजाराम यांच्या खरेदी मालकीच्या असुन शेतमिळकतींची त्यांनी त्यांच्या हयातीतच विल्हेवाट लावलेली असुन सिटी सर्व्हेच्या मिळकती प्रतिवादी क्र. ०१ च्या एकटयाच्या मालकीच्या असुन राजारामचे इतर सर्व वारसांनी प्रतिवादी क्र. ०१ चे लाभात हक्कसोडपत्र लिहून नोंदवून दिलेल्या असल्याने प्रतिवादी क्र. ०१ हा एकमेव दावा मिळकतीचा कायदेशीर मालक आहे. वादी अथवा प्रतिवादी क्र. ०२ ते ०८ यांचा दावा मिळकतीत हक्क, हिस्सा व अधिकार नसल्याने वादीची दाव्यातील वाटपाची, ठरावाची व निरंतर ताकीदीची मागणी कायदेशीर नाही.

**११.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचे पुढे असे म्हणणे आहे की, दावा मिळकतीपैकी सर्व्हे नं. १०७६/(१२८०)अ/५अ/१अ/अ, क्षेत्र १३००.०० चौ. मी. ला निवासी प्रयोजनासाठी दिनांक १२/०७/२०११ रोजी सिन्नर नगरपालिकेने परवानगी दिलेली असुन रहिवासाकामी रेखांकन परवानगी सन २०१९ मध्ये घेतली आहे. तसेच, प्रतिवादींनी दिनांक १८/०२/२०२० रोजी वकीलांकडून टायटल रिपोर्ट दिनांक १४/१२/२०२० रोजी घेवून सदर मिळकतींची रक्कम रू. ८४,३५,०००/— किंमतीचा विकसन करारनामा केला असुन प्रतिवादी क्र. ०९ व १० यांनी सुमारे १ कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्च करून सदर प्लॉट मिळकतीवर ०८ मजली इमारतीचे बांधकाम पुर्ण केले आहे. वादीचा निशाणी क्र. ०५ चा अर्ज व दाव्यातील मागणी ही उशिराची आहे. या स्थितीत वादीला प्रतिवादी क्र. ०९ व १० विरूद्ध बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा मनाई हुकूम मागता येणार नाही.

**१२.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वादीने त्याचा हिस्सा शाबित केल्यास त्याला तो मिळेलच. या परिस्थितीत वादीची प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचेविरूद्ध तुर्तातुर्त ताकीद हुकुमाची मागणी मंजुर करता येणार नाही. सदर प्रतिवादींनी कर्ज काढून कोटी रूपयांची गुंतवणूक केली असल्याने वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे मोठे नुकसान होणार

आहे. याउलट वादीचा निशणी ०५ चा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट अंतिम सुनावणीत वादीचा दावा मिळकतीत जो काही हिस्सा असेल तो त्याला बांधकामासह मिळेल. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०९ व १० विरूद्ध तुर्तातुर्त ताकीद हुकूम दिल्यास प्रतिवादींनी बॅंकेकडून घेतलेल्या कर्जावू रक्कमेची परतफेड करता येणार नाही व कोटी रूपये खर्च करून उभे केलेले बांधकाम थांबविल्यास प्रतिवादी क्र. ०९ व १० चे कशानेही न भरून येणारे असे मोठे नुकसान होईल. असे झाल्यास प्रतिवादी क्र. ०९ व १० यांना आत्महत्या केल्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही.

**१३.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचे पुढे असे म्हणणे आहे की, अशा परिस्थितीत दावा मिळकतीचे रेकॉर्डला वादीचे अथवा त्याच्या आईवडीलांचे कोणत्याही प्रकारचे नाव नसतांना व सन १९९५ मध्ये दावा मिळकत प्रतिवादी क्र. ०१ चे नावावर दाखल केली असतांना वादीने सुमारे ३० वर्षांचे विलंबानंतर दावा दाखल करून केलेली तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी नैसर्गिक न्यायाचा विचार करता मंजुर करता येणार नाही. कोणतेही कारण घडलेले नसतांना व दावा मिळकतीशी वादीचा दुरान्वये कोणताही संबंध नसतांना वादीने प्रतिवादींवर खोटा दावा दाखल करून त्यांना निष्कारण खर्चात पाडले म्हणून या दाव्याचा खर्च नुकसान भरपाई म्हणून रू. १ लाख वादीकडून प्रतिवादींना देण्याचा हुकूम व्हावा. वादीस सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा तौलानिक तराजु देखील प्रतिवादींचे लाभात आहे. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा व दाव्याचा खर्च वादीकडून प्रतिवादींना मिळावा, अशी या प्रतिवादींची मागणी आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ निशाणी क्र. ३६ अन्वये सदर प्रतिवादींतर्फे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे.

**१४.** वादी व प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

अ. युक्तिवादादरम्यान वादीतर्फे खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आलेला आहे:—

**A) Bhimabai Kambekar (D) Thr. LR Vs. Arthur Import and Export Company and Ors. (2019 (6) Mh.L.J.4);**

**Held :-** *"Mutation entries of land does not create or extinguish title over such land nor it has any presumptive value on title. It only enables person in whose favour mutation in records is made to pay land revenue in respect of land."*

**B) Ghanshyam Sarda Vs. Shashikant Jha, Director, M/S. J.K.Kute Mills Co. & Ors. (2017(3)Mh.L.J. 19);**

**Held:-** *"Transfer of any tangible immovable property comes into effect and becomes valid and effective only by a registered document."*

**C) Ravindra Narayan Rajarshi & Ors. Vs. Smt. Rohini Ganpatrao Heblikar (Decided on 31/07/2017);**

**Held:-** *"The present suit is for the specific performance and not merely for avoidance or cancellation of contract. The plaintiff is a non-executant to the subsequent sale deed which was executed lis pendens. In view of the ratio lead down by the Hon'ble Supreme Court in the case of Suhrid Singh @ Sardoon Singh (Supra), if a person is non-executant to a deed or agreement and seeks a declaration that it is not binding on it as void, then he is not required to pay ad-valorem Court fees on the consideration amount of the said agreement but is to be valued notionally. It is borne in mind that the plaintiff is compelled to seek relief in respect of such deed and against the transferee as the property is transferred during the pendency of the suit. In so far as that relief is concerned, it being a consequential relief of declaration, is not susceptible to monetary consideration."*

**D) The State Of Punjab & Ors. Vs. Bhangwantpal (D) Thr. Lrs. (2024 SAR (Civ.)1150);**

**Held :-** *"Revenue records are only entries for the purpose of realizing tax by Municipal Corporations or land revenue by Gram Sabhas."*

ब. युक्तिवादादरम्यान प्रतिवादी क्र. ०९ व १० तर्फे विर्निदिष्ट अनुतोष अधिनियमाचे कलम ४१ चा संदर्भ देवून खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आलेला आहे:—

**A) Pandurang Ramchandra Gaikwad Vs. Murlidhar Shripati Gaikwad (1993 B.C.J.85);**

**Held :-** *"The plaintiff failed to prove his actual possession and cultivation over the suit properties. His name does not appear in the village record in respect of property in question. The controversy in respect of the actual possession and cultivation of suit properties in question can be solved only on consideration of detailed evidence on record which may be adduced by the parties."*

**B) Paresh Mahant Vs. Arun Mahant & Ors. (2015(2)Mh.L.J.812);**

**Held :-** *"Plaintiff should have filed suit for administration of estate of deceased father within 03 years of death of his father when cause of action accrued to plaintiff upon succession."*

**C) Tirth Ram Sharma Vs. Gaurav Mohan Bhagat (2019 (1) Mh.L.J. 533);**

**Held :-** *"If a co-owner wants to erect a homestead on the land, he is free to do so. When a division of the co-ownership property takes place, the co-owner who put up the homestead can claim that the said portion may be allotted to his share. Courts would ordinarily grant such equitable relief when claimed (vide Nutbhari Das v. Nanilal Das). If the other co-owner objects to the construction of a homestead, he can get the co-ownership property divided by partition, and if the other party is not readily willing to that course, it is open to him to get it partitioned through a suit. These are various remedies available to the co-owner in respect of his land. Merely because he has to resort to such steps, it cannot be said that a co-owner cannot erect a homestead on his land."*

**१५.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुदद्े माझे विवेचनाकरीता उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे:—

| अ.क्र. | मुदद्े | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सिध्द् करतो काय की, सकृतदर्शनी केस त्याच्या बाजूने आहे ? | ...होय |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी सिध्द् करतो काय की, न्यायाचा तौलानिक तराजू त्याच्या बाजूने आहे ? | ...होय |
| ३. | वादी सिध्द् करतो काय की, निशाणी क्र. ०५, २८ व ३७ वरील दाखल केलेले अर्ज नामंजुर झाल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होईल ? | ...होय |
| ४. | आदेश काय ? | ..... निशाणी क्र. ०५, २८ व ३७ अर्ज मंजुर करण्यात येत आहेत. |

## कारणमिमांसा

**मुददे् क्र. ०१ ते ०३ करीता** :—

**१६.** सदर मुददे् एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. तुर्तातूर्त मनाई अर्ज निकाली काढतांना दोन्ही पक्षकारांपैकी कोणास सकृतदर्शनी बाजू, न्यायाचा समतोल कोणाच्या हक्कात आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणत्या पक्षकाराचे जास्त नुकसान होईल, हे पहाणे जास्त गरजेचे असते. त्यामुळे वादी, प्रतिवादींचे अभिकथन व दोन्ही पक्षकारांतर्फे सकृतदर्शनी देण्यात आलेला लेखी अथवा तोंडी पुरावा पहाणे गरजेचे आहे.

**१७.** प्रस्तुत प्रकरणात वादीने सिन्नर २ येथिल भूमापन क्र. १०७६/५/अ/१/अ/अ/प्लॉट/१ चा ७/१२ उतारा, सिन्नर २ येथिल भूमापन क्र. १०७६/५/अ/१/अ/अ/प्लॉट/२ चा ७/१२ उतारा, सिन्नर २ येथिल भूमापन क्र. १०७६/५/अ/१/अ/अ/प्लॉट/३ चा ७/१२ उतारा, सिन्नर येथिल नगर भूमापन क्र. ३२५१, ३२५२ चे मालमत्तापत्रक, खरेदीखत दस्त क्र. ६९०/१९५० ची प्रमाणित प्रत, सिन्नर येथिल फेरफार नोंद क्र. १२८८८, १६७९५ ची प्रमाणित प्रत, प्रतिवादी क्र. ०१ ने नगर भूमापन क्र. ३२५१ व ३२५२ करीता वारस नोंद होणेकामी केलेल्या अर्जाची कार्यालयीन टिपणीची प्रमाणित प्रत, भुमी अभिलेख कार्यालय, सिन्नर येथिल फेरफार नोंद क्र. १५०९ संबंधातील दप्तरी आदेशाची प्रमाणित प्रत, शांताबाई राजाराम सरोदे यांचे मृत्यू दाखल्याची छायांकित प्रत, शंताबाई बाळासाहेब साठे यांचा मृत्यू दाखला, वादीची विवाह पत्रिका, विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० ची प्रमाणित प्रत, खरेदीखत दस्त क्र. ४०६९/२०२१ ची प्रमाणित प्रत, वादीतर्फे ॲड. उगले यांचेमार्फत पाठविलेल्या नोटीसची छायांकित प्रत, प्रतिवादी क्र. ०१ ने

पाठविलेले नोटीस उत्तर, बबाबाई राजाराम सरोदे हिचा बॅन्क ऑफ महाराष्ट्र येथिल खाते क्र. १३२९ या खात्याचे पासबुक, बबाबाई राजाराम सरोदे हिने बॅन्कमध्ये पैसे जमा करतेवेळी दाखल केलेल्या पावत्यांची छायांकित प्रत ऑफ महाराष्ट्र येथिल खाते क्र. १३२९ या खात्याचे पासबुक, इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

**१८.** प्रतिवादी क्र. ०९ व १० तर्फे ६ड नोंद क्र. १२८८८, १६७९५ चा प्रमाणित उतारा, आठ मजली इमारतीचे बांणकाम पुर्ण झाल्याबाबतची एकूण ०४ छायाचित्रे, आठमजली इमारतींची छायाचित्रे, कामगार तलाठी, सिन्नर यांना दिलेलया अर्जाची नक्कल, प्रतिज्ञापत्र, राजाराम उर्फ राजहंस व इतर मुली यांचे संमतीपत्र, इमारत बांधकामासाठी परवानगीसाठी प्रतिवादींनी रू. ३५,७१,४८७/— भरल्याची पावती, खर्चाचा तपशील, स. क्र. १०७६/अ/५/अ/३ व स. क्र. १०७६/अ/५/अ/४ यांचा विकसन करारनामा, स. क्र. १०७६/अ/५/३ व स. क्र. १०७६/५/अ/१/अ प्लॉट क्र. १+१ चा विंग ए चा मंजूर प्लॅन, स. क्र. १०७६/५/अ/१/अ प्लॉट क्र. १+१ चा विंग बी चा मंजूर नकाशा, सिन्नर २ येथिल भूमापन क्र. १०७६/अ/५/अ/३/व/४ व १०७६/५/अ/१/अ/अ/प्लॉट/१ यांचा ७/१२ उतारा, इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

**१९.** वादीतर्फे दाखल अभिकथन व युक्तिवादानुसार, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या सामाईकातील मिळकती असुन त्यांच्यामध्ये अजुन आपसात वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी क्र. ०६ ते ०८ यांचा दावा मिळकतीमध्ये १/६ इतका अविभक्त हिस्सा आहे. असे असतांना प्रतिवादी क्र. ०१ ने २००५ साली दावा कलम १ ब मधील मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला मयत राजाराम सरोदे यांचे वारस नोंद होणेकामी अर्ज सादर करतांना वादीची मयत आई शांताबाई व वादी यांना सामील केले नाही. प्रतिवादी क्र. ०१ ने भुमी अभिलेख, सिन्नरकडे दाखल केलेल्या वारस नोंद अर्जाची व त्यावरील दप्तरी आदेशाची प्रत पाहिली असता त्यामध्ये मयत राजाराम सरोदे यांच्या वारसांची नावे या सदरी वादीच्या मयत आईचे किंवा वादीचे नाव समाविष्ट नाही.

**२०.** वादीच्या पुढील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ०१ ने सिन्नर येथील भुमापन क्र. १०७६/५/अ/१ चे सन २००९ मध्ये बिनशेती रूपांतरण करून वादीच्या संमतीविना प्रतिवादी क्र. ०९ व १० यांचे लाभात दावा कलम १ अ (i) मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने दि. २४/१२/२०२० रोजी प्रतिवादी क्र. ९ व १० यांना विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० हा दस्त लिहुन व नोंदवुन दिला. तसेच त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने वादीची कुठलीही संमती न घेता दावा कलम १ अ (ii) यात नमुद केलेली मिळकत दि. ०९/११/२०२१ रोजी बेकायदेशीररित्या दस्त क्र. ४०६९/२०२१ अन्वये प्रतिवादी क्र. ११ यांना हस्तांतरीत केली. सदर दोन्हीही दस्तांमध्ये वादी हे पक्षकार नव्हते, तसेच वादींनी सदर दस्तात कोणत्याही प्रकारे संमती दिलेली नव्हती अथवा वादींना सदर दस्तांसंबंधी कोणतीही माहिती नव्हती.

**२१.** सदर विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० व खरेदीखत दस्त क्र. ४०६९/२०२१ यांची प्रत पाहिली असता सदर बाब दिसून येते. सदर दोन्ही दस्तांवर वादीची संमती देणार म्हणुन स्वाक्षरी असल्याचे दिसून येत नाही. दि. ०५.०६.२०२४ रोजीची ॲडव्होकेट उगले यांच्या मार्फत देण्यात आलेली नोटीस पाहिली असता प्रतिवादी क्र. ०१, ०९, १०, ११ व मुख्याधिकारी, सिन्नर नगरपालिका यांना सदरची नोटीस पाठविल्याचे दिसुन येते. त्यावर प्रतिवादी क्र. ०१ ने त्यांचे विधिज्ञामार्फत नोटीस उत्तर दिल्याचे दिसुन येते.

**२२.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या सदर नोटीस उत्तरातील कथनानुसार व निशाणी क्र. ०५ वरील अर्जावरील म्हणण्यानुसार, कसबे सिन्नर येथील नगर भुमापन क्र. ३२५१ व ३२५२ या मिळकती प्रतिवादी क्र. ०१ च्या वडिलांच्या स्वसंपादित व खरेदी मालकीच्या आहेत. सदर मिळकतीच्या अनुषंगाने कमळाबाई तिडके, मिराताई तिडके, मंगलाताई धरम व लताबाई बस्ते यांनी प्रतिवादी क्र. ०१ च्या लाभात कायदेशीर दस्त लिहुन व नोंदवुन दिले आहे. प्रतिवादी क्र. ०९ व १० तर्फे कार्यकारी दंडाधिकारी, सिन्नर यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र यांची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर प्रतिज्ञापत्र पाहिले असता राजहंस उर्फ राजाराम सरोदे यांनी सिन्नर येथील सर्व्हे क्र. १०७६(१२८०अ)५अ/१/अ ही मिळकत स्वसंपादित खरेदी मालकीची असुन ती

त्यांचा मुलगा प्रतिवादी क्र. ०१ याच्या नावावर करण्यास हरकत नसल्याचे नमुद करण्यात आले आहे.

**२३.** वादीच्या कथनांप्रमाणे, दावा मिळकती या राजाराम उर्फ राजहंस सरोदे यांच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन खरेदी घेतलेल्या मिळकती आहेत. साल सन १९५० मधील खरेदीखत दस्त क्र. ६९०/१९५० ची प्रत पाहिली असता पांडुरंग व राजहंस व रामदास यशवंत सरोदे यांचे अ.पा.क. भाऊ नामे पांडुरंग यशवंत सरोदे यांनी यसुदाबाई राधुसिंग परदेशी यांचेकडुन सर्व्हे १२८०/५(१०७६)५ ही मिळकत खरेदी केल्याचे दिसुन येते. सदर खरेदी दस्तावर राजाराम उर्फ राजहंस यांच्यासोबत पांडुरंग व रामदास यांची नावे दिसुन येतात. तसेच सदर मिळकत त्यांचे अ.पा.क. भाऊ नामे पांडुरंग यशवंत सरोदे यांनी खरेदी घेतल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या कथनांनुसार, सदर मिळकत राजाराम उर्फ राजहंस सरोदे यांची स्वकष्टार्जित व स्वसंपादित असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

**२४.** प्रतिवादी क्र. ०९ व १० तर्फे दाखल सदर कार्यकारी दंडाधिकारी, सिन्नर यांचे समोर केलेल्या दि. ११/१२/१९९५ रोजीच्या संमतीपत्रावर कमळाबाई तिडके, मिराताई तिडके, मंगलाताई धरम व लताबाई बस्ते यांनी प्रतिवादी क्र. ०१ च्या लाभात नाव नोंदणी करण्यास संमती असल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यावर अनुक्रमांक ०६ वर बबाबाई राजाराम सरोदे यांची स्वाक्षरी असल्याचे दिसुन येते. सदर बाबीवर लक्ष वेधुन वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, बबाबाई ही स्वाक्षरी न करता अंगठे करत होती. त्या संदर्भात वादीने बबाबाई सरोदे हिच्या बॅन्क खात्याच्या पासबुकची व बॅन्केत रक्कम भरलेल्या पावत्यांची छायांकित प्रत सादर केली असुन त्यावर तिचा अंगठा असल्याचे दिसुन येते. ***Ghanshyam Sarda Vs. Shashikant Jha, Director, M/S. J.K.Kute Mills Co. & Ors. (2017(3)Mh.L.J. 19*** यामध्ये मा. ना. वरिष्ठ न्यायालयाने निरीक्षण नोंदविलेनुसार, वादीची आई शांताबाई हिने प्रतिवादी क्र. ०१ च्या हक्कात नोंदणीकृत हक्कसोडपत्र करून दिल्याचे दिसुन येत नाही.

**२५.** प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुतचा दावा हा मुदतीत दाखल नसल्याने वादीस तुर्तातुर्त मनाई मागण्याचा अधिकार नाही. परंतु,

सदरचा दावा मुदतीत नसल्याची बाब वादीने नाकारली आहे. मुदतीचा वादमुद्दा हा कायदा व वस्तुस्थिती यांचा संमिश्र प्रश्न असल्याने दावा मुदतीत आहे की नाही, यासाठी दोन्ही पक्षकारांकडून पुराव्यांची गरज आहे. त्यामुळे सद्यस्थितीत त्याबाबतीत कोणताही निष्कर्ष काढणे, न्यायोचित होणार नाही. प्रतिवादी क्र. ०९ व १० यांनी वादीने अपुरा न्यायालयीन मुद्रांक भरल्याची हरकत नोंदविली आहे. परंतु, ***<u>Ravindra Narayan Rajarshi & Ors. Vs. Smt. Rohini Ganpatrao Heblikar (Decided on 31/07/2017)</u>*** यामध्ये मा. ना. वरिष्ठ न्यायालयाने निरीक्षण नोंदविलेनुसार खरेदीखत दस्त क्र. ४०६९/२०२१ व विकसन करारनामा दस्त क्र. ३८००/२०२० या दोन्ही दस्तांस वादी पक्षकार नसल्याने त्यातील मोबदल्याच्या रकमेवर वादीने न्यायालयीन मुद्रांक देणे अपेक्षित नाही. सबब, त्याबाबतीत मांडलेले अभिकथन संयुक्तिक वाटत नाही.

**२६.** त्यामुळे वादीने मांडलेले कथनांत सकृतदर्शनी तथ्य दिसत असुन दोन्ही पक्षकारांच्या विरूध्द अभिकथनांनुसार गुणदोषावर सदर वादमुद्दे निकाली काढणे गरजेचे असुन त्यासाठी संपरिक्षेची गरज आहे. त्यामुळे वादीने मांडलेले कथन हे सकृतदर्शनी फेटाळण्याजोगे नाही. त्यामुळे वादीस सकृतदर्शनी केस आहे.

**२७.** अभिलेखावरून सकृतदर्शनी प्रतिवादी क्र. ०१ ने दावा मिळकतींपैकी एका मिळकतीचे प्रतिवादी क्र. ११ च्या हक्कात खरेदीखत नोंदविल्याचे व एका मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या हक्कात विकसन करारनामा नोंदवुन दिल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र. ०९ व १० यांच्या म्हणण्यानुसार व दाखल छायाचित्रांनुसार, दावा मिळकतींपैकी सर्व्हे नं. १०७६/(१२८०)अ/५अ/१अ/अ, क्षेत्र १३००.०० चौ.मी. ला निवासी प्रयोजनासाठी दिनांक १२/०७/२०११ रोजी सिन्नर नगरपालिकेने परवानगी दिलेली असुन रहिवासाकामी रेखांकन परवानगी सन २०१९ मध्ये घेतली आहे. तसेच, प्रतिवादींनी दिनांक १८/०२/२०२० रोजी वकीलांकडून टायटल रिपोर्ट दिनांक १४/१२/२०२० रोजी घेवून सदर मिळकतींची रक्कम रू. ८४,३५,०००/— किंमतीचा विकसन करारनामा केला असुन प्रतिवादी क्र. ०९ व १० यांनी सुमारे १ कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्च करून सदर प्लॉट मिळकतीवर ०८ मजली इमारतीचे बांधकाम पुर्ण केले आहे.

२८. वादीचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा असल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येत असल्याने, केवळ प्रतिवादी क्र. ०९ व १० यांनी सदर विकसन करारनाम्यानुसार, सदर बांधकामासाठी खूप मोठी रक्कम खर्च केल्याची व त्यांचेवर बॅन्केचे कर्ज असल्याची बाब गृहित धरून, अर्ज मंजूर केल्यास सदर प्रतिवादींचे वादीपेक्षा जास्त नुकसान होईल, असा निष्कर्ष काढता येणार नाही. अर्ज मंजूर झाल्यास सदर प्रतिवादींचे केवळ पैशांचे नुकसान होईल व ते कधीही न भरून येण्यासारखे नाही, असे नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास सदर बांधकाम पुर्ण होवून त्यावरील वादीचा वारसा हक्काने हिस्सा संपरीक्षेअंती निघाल्यास, वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल, असे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच, प्रस्तुतचे तिन्ही अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र. ०१ व ११ यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल, असेही सकृतदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे वादीच्या हक्कात न्यायाचा तौलानिक तराजू असल्याचे दिसुन येते.

२९. त्यामुळे प्रतिवादी क्र. ०१, ०९ व १० यांनी वर दावा कलम १ अ (i) यात नमुद केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने सदर मिळकतींची स्वत: अगर इतर कोणाही मार्फत गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये, सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अथवा सदर मिळकतीतील बांधीव क्षेत्र कोणासही हस्तांतरण करु नये अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेस वादी पात्र आहे.

३०. तसेच प्रतिवादी क्र. ११ यांनी दावा कलम १ अ (ii) यात नमुद केलेल्या मिळकतीचे स्वत: अथवा इतर अन्य, कुटुंबिय, नोकर, एजंट, नातेवाईक अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये, तसेच सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये, अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, तसेच प्रतिवादी क्र. ०१ याने दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळतीच्या रे.ऑ.रा.ला त्याचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीची स्वत: अथवा इतर अन्य, कुटूंबिय, नोकर, एजंट, नातेवाईक अथवा

कोणाही मार्फत कोणासही गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये व सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेस वादी पात्र आहे.

**३१.** वरील विवेचन गृहीत धरता, सदरचे तिन्ही अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुदद्या क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहे.

**मुदद्या क्र. ०४ करीता** :—

**३२.** उपरोक्त मुददे क्र. ०१ ते ०३ करता केलेल्या विवेचनाच्या अनुषंगाने तुर्तातूर्त मनाई हुकूमाचे तिन्ही अर्ज मंजूर होणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :—

**—: आदेश :—**

१ अर्ज (निशाणी क्र.०५, २८ व ३७) मंजुर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादी क्र. ०१, ०९ व १० यांनी दावा कलम १ अ (i) यात नमुद केलेल्या मिळकतीच्या संदर्भाने सदर मिळकतीची स्वत: अगर इतर कोणाहीमार्फत गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये, सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अथवा सदर मिळकतीतील बांधीव क्षेत्र कोणासही हस्तांतरण करु नये अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये. तसेच प्रतिवादी क्र. ११ यांनी दावा कलम १ अ (ii) यात नमुद केलेल्या मिळकतीचे स्वत: अथवा इतर अन्य, कुटुंबिय, नोकर, एजंट, नातेवाईक अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये, सदर मिळकतीचे स्वरुपात कोणताही बदल करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अथवा सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, तसेच प्रतिवादी क्र. ०१ याने दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळतीच्या रे.ऑ.रा.ला त्याचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीची स्वत: अथवा इतर अन्य कोणाही मार्फत कोणासही गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, विक्री अथवा कोणत्याही मार्गाने, कोणासही हस्तांतरण करु नये. तसेच सदर मिळकतींवर कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी क्र. ०१, ०९, १० व

११ यांचेविरूध्द दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत पारित करण्यात येत आहे.

३ वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम ३क नुसार आवश्यक ती पुर्तता मुदतीत करावी.

४ खर्चाबाबत आदेश नाही.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.04.28 11:44:24 +0530

( **आर. आर. कुलकर्णी** )

ठिकाण :— सिन्नर. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

दिनांक :—२३/०४/२०२५. सिन्नर न्यायालय, सिन्नर